International Referred Research Journal, April, 2011. ISSN- 0974-2832 RNI-RAJBIL 2009/29954.VoL.III *ISSUE-27

शोध पत्र- शिक्षा

# अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांची अध्यापन व्यवसायातील अभिरूची विकसित करण्यासाठी विविध संप्रेषण मार्गांचा अवलंब करून

* डॉ. सौ. जय श्री मधुसुदन नेमाडे

April, 2011

* प्राचार्य, शिक्षणशास्त्र महिला महाविद्यालय, फैजपूर , जळगाव, महाराष्ट्र

## प्रस्तावना

महाराष्ट्रातील सर्व अध्यापक विद्यालयात प्रवेश प्रक्रिया ही विद्यार्थ्यांच्या'शैक्षणिक अर्हता' या निकशावर पूर्ण केली जाते विद्यार्थी घडवू इच्छिणा–या भावी छात्राध्यापकाच्या प्रवेश निवडीसाठी कोणतीही अभिरूची चाचणी वापरली जात नाही. परिणामी अध्यापन कार्याची मनापासून आवड नसलेले तसेच आवश्यक अध्यापन कौशल्य नसलेले अनेक छात्र अध्यापक प्रवेशित असण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रवेशित छात्रध्यापकाला अध्यापनाची आवड आहे अथवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. अध्यापन कार्यात आवड नसल्यास प्रवेशित छात्राध्यापकाची अभिरूची वाढवण्यासाठी त्याचे पूर्वग्रह दूर करणे व अध्यापन व्यवसायाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन संप्रेपित करणेसाठी योग्य संप्रेशण तंत्राचा अवलंब करणे गरजेचे आहे.तरच प्रशिक्षण कार्यक्रम हा फलदायी व परिणाम कारक होईल.अध्यापन विषयक अभिरूची ही छात्र अध्यापकापूर्ती मर्यादित नसून ती पूढे त्याने विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करणे गरजेचे आहे. अध्यापन परिणामकारक व यशस्वी होण्यासाठी अनेक घटक महत्वाचे असतात. यासर्व घटकांची एकत्र गुंफण म्हणजेच अभिरूची पूर्ण अध्यापन होय. आवश्यक बुद्धिमत्ता ,

मूलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, अध्यापनाची आवड, वक्तशिरपणा, स्वस्विकृती, विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान, मुलांच्या मानसशास्त्राचे ज्ञान, व्यक्तिमत्व इ. घटक प्रवेश घेवू इच्छिणा–या विद्यार्थ्यात आहे अथवा नाही याचे मापन करणे गरजेचे आहे. अध्यापन कार्याची आवड हा अत्यंत महत्वाचा व आवश्यक असा घटक आहे.अनेक अभ्यासकांनी काढलेल्या निकर्षानुसार ज्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्याला अध्यापन कार्याची आवड असते तो विद्यार्थी प्रशिक्षणाचे ज्ञान लवकर ग्रहण करतो प्रवेशित छात्राध्यापकांना खरोखरच अध्यापनात आवड आहे का? ते पाहून त्यांची या व्यवसायातील अभिरूची विविध संप्रेशण मार्गांचा अवलंब करून वाढविता येते का? हे शोधण्यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेतले गेले.

## संशोधनाची गरज व महत्व

अध्ययन अध्यापन प्रकियेत शिक्षकाचे स्थान महत्वाचे असते. अलिकडे शिक्षकाची भूमिका फारच व्यापक बनलेली आहे. परंपरागत ज्ञान दात्याच्या भुमिकेशिवाय शिक्षकाकडे पालक पर्याय, जिवलग मित्र, सल्लागार, समुपदेशक, संस्कृती मूल्यांचा प्रक्षेपक आणि व्यक्तीमत्व विकासाचा मदतनीस म्हणून पाहीले जाते. भारतात शिक्षकाची मुख्य भूमिका ज्ञान दात्याची आहे. त्या शिवाय शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन विशिष्ट प्रशिक्षित शिक्षक करतात. क्रिडा, कला यासाठी स्वतंत्र शिक्षक असतात. पालकांप्रमाणे विद्यार्थ्यांशी स्नेहाळ संबंध जोडणारे काही शिक्षक सापडतात. पण बऱ्याच शिक्षकांची भूमिका ठराविक अध्यापन क्षेत्राबाहेर जात नाही. बालवयापासूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणारे शिक्षक अध्यापक विद्यालयातून तयार केले गेले पाहिजे. सद्यस्थितीत शैक्षणिक गुणवत्तेवर अध्यापक विद्यालयात प्रवेश दिले जातात. तथापि या विद्यार्थ्यांना अध्यापन व्यवसायाची खरोखरच आवड असते का? मुळात आवड नसल्यास अध्यापन व्यवसायाचे महत्व पटविणारे प्रभावी व्याख्यान, आदर्श शिक्षकाचे अनुभवाचे बोल या व्यवसायातून मिळणारे मानसिक समाधान या बाबतची माहीती प्रभावी पणे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविली तर विद्यार्थ्यांच्या अभिरूचीत वाढ होते का? हे पाहण्यासाठी प्रस्तूत संशोधन करणे गरजेचे वाटले.

## समस्या विधान

अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची अध्यापन व्यवसायातील अभिरूची विकसित करण्यासाठी विविध संप्रेषण मार्गांचा अवलंब करून परिणामकारकतेचा अभ्यास.

## संशोधनाची गृहीतके

छात्राध्यापकांना अध्यापन कार्याबद्दल पूर्वज्ञान आहे.
छात्राध्यापकांच्या अध्ययन अध्यापनाच्या संकल्पना स्पष्ट आहेत.
विविध उपकमाव्दारे अध्यापन कार्याबद्दल अधिक प्रगल्भ ज्ञान छात्राध्यापकां पर्यंत पोहचविता येते.

## परिकल्पना

संप्रेषण कार्यक्रम पूर्व व संप्रेषण कार्यक्रमोत्तर दिल्या गेलेल्या अभिरूची चाचणीतील प्राविण्यात सार्थ फरक नाही.

## उद्दिष्ट्ये

1. विद्यार्थ्याच्या प्रशिक्षणपूर्व अभिरूचीचा शोध घेणे
2. अध्यापन व्यवसायाची अभिरूची वाढविण्यासाठी उपक्रमांची योजना करणे 3. अभिरूची वृध्दीसाठी आयोजित केलेल्या संप्रेषित कार्यक्रमाची परिणाम कारकता पाहणे

## कार्यात्मक व्याख्या –

1. अध्यापक विद्यालय – इ. पहीली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना कसे शिकवावे या संबंधी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणारे विद्यालय
2. व्यावसायिक अभिरूची – ठराविक व्यवसायाबद्दल असलेली आवड 3. संप्रेशण मार्ग – एका व्यक्ती कडून दूसऱ्या व्यक्तीकडे प्रभावी माध्यमाव्दारे माहिती चे हस्तांतरण

व्याप्ती व मर्यादा :–

व्याप्ती – सर्व अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांची अभिरूची वाढविण्यासाठी हे संशोधन उपयोगी ठरेल.

मर्यादा – सदर संशोधनासाठी अध्यापक विद्यालय फैजपूरच्या प्रथम वर्पाच्या विद्यार्थ्याची निवड केलेली आहे.

जनसंख्या– जळगाव जिल्हयातील सर्व अध्यापक विद्यालयातील प्रथम वर्पाचे विद्यार्थी

न्यादर्श –

अध्यापक विद्यालय फैजपूर येथिल (सन 2009–10) प्रथम वर्पात प्रवेश घेतलेले सर्व 47 विद्यार्थी

संशोधनाची पद्धती –

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक पध्दतीचा अवलंब केला आहे. अभिकल्प निवड प्रस्तुत संशोधनासाठी एकलगट अभिकल्पाची निवड केलेली आहे.

संशोधन साधने –

कक्कर यांची अभिरूची शोधिका.

सामग्री विश्लेषणाच्या अन्वयार्थासाठी सांख्यिकिय परिमाण तथ्यांचे विष्लेषण करण्यासाठी 'टी' परिक्षिका या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर केला

संशोधनाची कार्यपध्दती –

सर्वप्रथम डॉ. एस बी कक्कर यांची प्रमाणित असलेली इंग्रजी भाषेतील अभिरूची शोधिका मराठी भाषेत रूपांतरीत करण्यात आली. मराठी भाषेत रूपांतरीत अभिरूची शोधिका तीन इंग्रजी विषय शिकविणाऱ्या तज्ञ प्राध्यापकांकडून तपासून घेण्यात आली. तज्ञांच्या सूचनेनुसार मराठी भाषांतरात योग्य ते बदल करण्यात आले. अध्यापक विद्यालयातील प्रवेषित प्रथम वर्षाच्या छात्राध्यापकांना ही अभिरूची शोधिका देण्यात आली. या चाचणीद्वारा उपक्रमपूर्व अचूक पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांची संख्या काढण्यात

| अ.न. | वि.संख्या | संप्रेषण कार्यक्रम राबविण्यापूर्वी | संप्रेशण कार्यक्रम राबविल्यानंतर | प्राप्त टी चे मूल्य | 0.01 स्तरावर टी चे मूल्य | 0.05 स्तरावर टी चे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1<br>2 | 47<br>47 | M=13 ·33<br>SD=2·90 | M=22·74<br>SD=3·29 | 31.76 | 2.68 | 2.01 |

आली. त्यानंतर आदर्श शिक्षकाचा विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वावर होणारा परिणाम, शिक्षकी पेशातून मिळणारे मानसिक समाधान, नैतिकतेचे मूल्य, तुच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार इ. विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली. अभिरूचीपूर्ण अध्यापन करणाऱ्या विद्यार्थ्याचे पाठ परीक्षण विद्यार्थ्यांकडून केले गेले. त्यानंतर उत्तरचाचणी देण्यात आाली. दोनही चाचण्यांचे परिक्षण केले. परिकल्पना तपासण्यासाठी चाचणीत मिळालेल्या गुणांवरून सांख्यिकी विश्लेषण केले व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष काढला. दोन चाचण्यातील फरक पुढील तक्त्यात दिल्याप्रमाणे दिसून आला. संप्रेषण कार्यक्रम राबविण्यापूर्वी विद्यार्थ्याचे अभिरूची चाचणीतील प्राविण्याचे मध्यमान 13.33 व प्रमाण विचलन 2.90 आहे.संप्रेपण कार्यक्रम राबविल्यानंतर विद्यार्थ्याचे अभिरूची चाचणीतील प्राविण्याचे मध्यमान 22.74 व प्रमाण विचलन 3.29 आहे. प्राप्त टी मूल्य 31.76 आहे. टी कोप्टकावरून स्वाधीनता मात्रा 46 असतांना ·01 स्तरावर सार्थकता स्तराची किंमत 2.68 आहे. 05 स्तरावर सार्थकता स्तराची किंमत 2.01 आहे.

परिकल्पना परिक्षण

दोन्ही स्तरावर प्राप्त टी चे मूल्य नमूना टी मूल्यापेक्षा जास्त आहे. त्यामूळे शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

अन्वयार्थ

संप्रेषण कार्यक्रम राबविण्यापूर्वी व संप्रेषण कार्यक्रम राबविल्यानंतर दिल्या गेलेल्या अभिरूची चाचणीतील प्राविण्यात सार्थ फरक पडतो.

शिफारशी

1. अध्यापक विद्यालयात प्रवेश देतांना शैक्षणिक अर्हता व अभिरूची चाचणीतील अर्हता लक्षात घेउन विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जावे
2. प्रवेशित विद्यार्थ्यांची शिक्षकी पेषातील अभिरूची वृध्दिंगत होण्यासाठी मुल्याधिप्ठीत कार्यक्रम राबविले जाणे अध्यापक विद्यालयात अनिवार्य करावे.

## संदर्भ ग्रंथ

कुंडले म. बा. 1996 – शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणि समाजशास्त्र – श्रीविद्या प्रकाशन दुनाखे अरविंद 1998 – प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान – नुतन प्रकाशन पुणे. 30 चौधरी प्र. श्रा. 2009 – उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक आणि शिक्षण – व्यंकटेश प्रकाशन मुळे व मराठे 1987 – शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे – महारा द्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ. पंडीत बबी 1997 – शिक्षणातील संशोधन – नुतन प्रकाशन, पुणे. Best J. W. and Kahn J. V. 1989 – Research in Education (New Delhi Prentice Hall Of India Pvt.Ltd.) pp 446 4-Bruce, J & Marsha, W.1985